■ RNI NO. MAHMAR/25/A3029

■ लातूर

■ वर्ष : ७ वे, अंक नं. : ७६

■ दि.१२ जुलै २०२६, वार : रविवार

■ पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

## हिंगोलीत पुन्हा भूकंपाचा धक्का, ३.५ रिश्टर स्केल तीव्रता

**हिंगोली/प्रतिनिधी :** हिंगोली जिल्ह्यात गेल्या गुरुवारी पहाटे सलग भूकंपाचे धक्के बसल्यानंतर त्यावरील चर्चा सुरू असतानाच शनिवारी (११ जुलै) रात्री ११.२६ वाजता पुन्हा ३.५ रिश्टर स्केल तीव्रतेचा भूकंपाचा धक्का जाणवला. या भूकंपाचा केंद्रबिंदू हिंगोली, वसमत आणि औंढा नागनाथ परिसरात असल्याची माहिती मिळाली.

धक्क्यापूर्वी भूगर्भातून गूढ आवाज आल्याचे अनेक नागरिकांनी सांगितल्याने काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. अनेक जण घराबाहेर धावून आले. गेल्या गुरुवारी बसलेल्या धक्क्यांमुळे नागरिक आधीच धास्तावलेले असताना पुन्हा भूकंप झाल्याने ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. मात्र, या भूकंपात कोणतीही जीवित किंवा वित्तहानी झालेली नसल्याने प्रशासनाने दिलासा व्यक्त केला आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता सतर्क राहावे आणि अधिकृत माहितीवरच विश्वास ठेवावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## सडलेले दुग्धजन्य पदार्थ, ब्रेड अन् खाद्यपदार्थ ताब्यात, आऊटलेटला टाळे ठोकले



**ठाणे/प्रतिनिधी :** ठाण्यातील नौपाडा परिसरातून अन्नपदार्थांच्या दर्जाबाबत एक अत्यंत धक्कादायक आणि संतापजनक प्रकार समोर आला आहे. नौपाड्यातील शिवानंद इमारतीमध्ये असलेल्या एका प्रसिद्ध खाद्यपदार्थ विक्री करणाऱ्या आउटलेटवर अन्न व औषध प्रशासनाने छापा टाकत मोठी कारवाई केली. एफडीएचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली ही धडक मोहीम राबवण्यात आली.

या आउटलेटमध्ये मोठ्या प्रमाणावर सडलेले दुग्धजन्य पदार्थ , ब्रेड आणि इतर खाद्यपदार्थ साठवून ठेवण्यात आले होते. या सडलेल्या अन्नामुळे संपूर्ण परिसरात प्रचंड तीव्र दुर्गंधी पसरली होती. यामुळे स्थानिक नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून, रहिवाशांनी या अस्वच्छतेबाबत तीव्र संताप आणि नाराजी व्यक्त केली आहे.

नौपाडा परिसरातील शिवानंद इमारतीजवळ गेल्या अनेक दिवसांपासून असह्य दुर्गंधी येत असल्याची तक्रार स्थानिक नागरिकांनी भाजप नगरसेवक संजय वाघुले यांच्याकडे केली होती. नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या या गंभीर तक्रारीची दखल घेत नगरसेवक संजय वाघुले आणि शिवसेनेचे पदाधिकारी किरण नाकती यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली.

आउटलेटमधील अत्यंत घाणेरडी आणि अस्वच्छ परिस्थिती पाहिल्यानंतर, त्यांनी अन्न व औषध प्रशासन विभागाकडे संपर्क साधून या बेजबाबदार दुकानदारावर तातडीने कठोर कारवाई करण्याची आक्रमक मागणी केली. लोकप्रतिनिधींच्या तक्रारीनंतर एफडीएची यंत्रणा तात्काळ ॲक्शन मोडमध्ये आली.

अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी या शिवानंद इमारतीमधील आउटलेटवर थेट छापा टाकला. या तपासणीदरम्यान अन्नपदार्थांच्या साठवणुकीत आणि स्वच्छतेच्या बाबतीत धक्कादायक त्रुटी आढळून आल्या आहेत. मानवी आरोग्यास अत्यंत घातक असलेले दुग्धजन्य पदार्थ आणि ब्रेड सडलेल्या अवस्थेत साठवून ठेवल्याचे अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आलं.

हे सर्व सडलेले खाद्यपदार्थ जप्त करण्यात आले असून, नागरिकांच्या आरोग्याला असलेला धोका लक्षात घेता संबंधित आउटलेट सील (ऍी) करण्याची कायदेशीर प्रक्रिया प्रशासनाकडून सुरू करण्यात आली आहे. नियमांचे उल्लंघन करून नागरिकांच्या जिवाशी खेळणाऱ्यांवर कोणतीही गय न करता कठोर फौजदारी कारवाई केली जाईल, असा इशारा एफडीएच्या अधिकाऱ्यांनी दिला आहे. या धडक कारवाईमुळे नौपाड्यातील नागरिकांनी सुटकेचा श्वास टाकला असून समाधान व्यक्त केले आहे.

# लातूर येथे सहकार संकुल इमारतीचे भूमिपूजन उत्साहात

## ■ सहकार क्षेत्राला बळकटी देण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध– सहकार मंत्री बाबासाहेब पाटील
## ■ राज्याच्या प्रगतीत सहकार चळवळीचा मोठा हातभार– पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले




**लातूर/प्रतिनिधी :** सहकार चळवळ ही आपल्या राज्याची वेगळी ओळख आहे. राज्यातील लाखो संसार सहकारामुळे उभे राहिले आहेत. बदलत्या काळानुसार सहकाराचे स्वरूप बदलत असून या क्षेत्राला अधिक बळकट करण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील असल्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी सांगितले. तसेच, सहकार चळवळीने ग्रामीण भागासह संपूर्ण राज्याच्या प्रगतीला मोठा हातभार लावला आहे. सहकार क्षेत्रात अग्रेसर असलेल्या लातूर जिल्ह्यातील सहकारी संस्था व बँकांना अधिक सक्षम करण्यासाठी आणि सहकार विभागाच्या सर्व सेवा एकाच छताखाली उपलब्ध होण्यासाठी सहकार संकुल उपयुक्त ठरेल, असा विश्वास पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी व्यक्त केला.

लातूर येथे सहकार संकुल इमारतीचे भूमिपूजन सहकार मंत्री बाबासाहेब पाटील अध्यक्षतेखाली आणि लातूरचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाला विधान परिषद सदस्य तथा मुख्य प्रतोद आमदार विक्रम काळे, जिल्हा परिषद अध्यक्षा उषाताई पाटील तळेगावकर, लातूरच्या महापौर जयश्री सोनकांबळे, नगरसेवक विक्रांत गोजमगुंडे, जिल्हा परिषद उपाध्यक्ष दयानंद सुरवसे, समाज कल्याण सभापती उत्तम माने, अहमदपूर पंचायत समितीचे सभापती सूरज पाटील, विभागीय सहनिबंधक नानासाहेब चव्हाण, जिल्हा उपनिबंधक व्ही. एल. पोतंगले, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य अभियंता रूपा राऊळ, अधीक्षक अभियंता बाबासाहेब थोरात यांच्यासह पदाधिकारी, अधिकारी यावेळी उपस्थित होते.

सहकार चळवळीमुळे आजवर राज्यात मोठा रोजगार निर्माण झाला. असून ही चळवळ जिवंत राहणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील सहकारी चळवळीचे माध्यम असलेल्या विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांना केवळ पारंपारिक व्यवसायापुरते मर्यादित न ठेवता, त्यांच्या माध्यमातून किराणा दुकानांपासून ते जेनेरिक औषध दुकानांपर्यंत विविध नवे उद्योग व व्यवसाय सुरू करण्याची परवानगी शासनाने दिली आहे. यामुळे सहकार क्षेत्रातून रोजगाराची नवनवीन दालने खुली होणार आहेत. बदलत्या काळात सहकार क्षेत्रात अमूलाग्र बदल होत असून, राज्याला १ ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनवण्यात सहकार चळवळ महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास सहकार मंत्री श्री. पाटील यांनी व्यक्त केला. राज्य शासनाने आणलेल्या अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेमुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. तसेच लातूर येथे उभारण्यात येणारे सहकार संकुल हे लातूरच्या वैभवात भर घालणारे आणि सहकार चळवळीला अधिक सक्षम करणारे ठरेल, असेही ते म्हणाले.

सहकार चळवळ बळकट करण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने स्वतंत्र सहकार मंत्रालय सुरु करून केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांच्या माध्यमातून शेतकरी व सहकारी संस्थांच्या हिताचे मोठे निर्णय घेतले आहेत. महाराष्ट्राला सहकाराची समृद्ध परंपरा आहे. राज्य शासनही सहकार चळवळीच्या सक्षमीकरणासाठी प्रयत्न करीत आहे. याचाच एक भाग म्हणून राज्यात सहकार संकुल उभारून सहकार विषयक विविध कार्यालये एकाच छताखाली आणण्याचे काम सुरू आहे. सहकारी संस्थांसाठी सर्व सेवा एकाच ठिकाणी मिळणार असून यामुळे वेळेची बचत आणि सेवांमध्ये सुलभता निर्माण होईल. संकुलाचे काम दर्जेदार, गुणवत्तापूर्ण झाले पाहिजे. कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यावेळी म्हणाले.

राज्य शासनाने आतापर्यंतची सर्वात मोठी शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केली आहे. या योजनेतील काही अटी वगळण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली असून, याचा लाभ लाखो शेतकऱ्यांना होईल, असा विश्वास पालकमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला.

शेतकऱ्यांना आधार देणाऱ्या सहकारी संस्थांसाठी उभारण्यात येणारे सहकार संकुल वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण व्हावे, असे आमदार विक्रम काळे यावेळी म्हणाले.

प्रास्ताविक विभागीय सहनिबंधक नानासाहेब चव्हाण यांनी केले. सहायक निबंधक श्री. गडेकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## शेखर सुमनचा स्टँडिंग कॉमेडीतून राजकीय व्यवस्थेवर सडकून प्रहार; आता त्यांच्याच फिल्म अकादमीच्या सह-संस्थापकावर ईडीची छापेमारी

**मुंबई/प्रतिनिधी :** अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) परकीय चलन व्यवस्थापन कायद्यांतर्गत (फेमा) कलानी इम्पेक्स प्रायव्हेट लिमिटेड आणि तिचे संचालक व व्यावसायिक, धर्मेश संगानी यांच्या कार्यालयांवर छापे टाकले. अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, परदेशात लपवलेली मालमत्ता, परदेशी बँक खाती आणि निर्यात महसुलातील कथित अनियमिततेच्या तपासाचा भाग म्हणून हे छापे टाकण्यात आले. धर्मेश संगानी हे चित्रपट निर्मितीमध्येही गुंतलेले असून, त्यांचा संबंध अभिनेते आणि टीव्ही होस्ट शेखर सुमन यांच्याशी आहे. ते शेखर सुमन फिल्म अकादमीचे सह-संस्थापक देखील आहेत. ईडीच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, ही कारवाई कलानी इम्पेक्स प्रायव्हेट लिमिटेड आणि धर्मेश संगानी यांच्याविरुद्ध सुरू असलेल्या तपासाचा एक भाग होती. वृत्तानुसार, तपासात असे उघड झाले आहे की, कंपनीच्या निर्यातीतून मिळालेला काही महसूल निर्धारित मुदतीनंतरही भारतात आणला गेला नाही. काही परदेशी खरेदीदारांकडून पैसे मिळाले नाहीत आणि अधिकृत डीलर बँकेकडून कोणतीही मुदतवाढ मागण्यात आली नाही. इतकेच नाही, तर थकीत रक्कम वसूल करण्यासाठी कोणतेही लेखी प्रयत्न केले गेले नाहीत. अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, तपासात असेही उघड झाले



आहे की, काही प्रकरणांमध्ये कागदपत्रांमध्ये नमूद केलेल्या खरेदीदारांऐवजी तृतीय-पक्ष कंपन्यांकडून निर्यातीची रक्कम स्वीकारण्यात आली होती. ईडीचा दावा आहे की, या छाप्यांमध्ये अघोषित परदेशी मालमत्ता आणि परदेशी बँक खात्यांशी संबंधित महत्त्वपूर्ण पुरावे देखील उघडकीस आले आहेत. एका अधिकाऱ्याने सांगितले की, तपासादरम्यान असे आढळून आले की, धर्मेश संगानी यांची एका कॅनेडियन कंपनीमध्ये मोठी हिस्सेदारी होती, ज्याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आली नव्हती. इतकेच नाही, तर या कंपनीशी संबंधित परदेशी बँक खाती आणि व्यवहार देखील उघड केले गेले नव्हते. तपासात संयुक्त अरब अमिरातीमध्ये एक अघोषित व्यावसायिक संस्था असल्याचेही उघड झाले आहे. अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, कॅनडा, अमेरिका आणि संयुक्त अरब अमिरातीमध्ये यापूर्वी अघोषित असलेली अनेक परदेशी बँक खाती ओळखण्यात आली आहेत.

ईडीचा असाही आरोप आहे की, छाप्यादरम्यान धर्मेश संगानी यांनी डिजिटल पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केला. अधिकाऱ्यांनी सांगितले की, जेव्हा ईडीचे पथक त्यांच्या निवासस्थानी पोहोचले, तेव्हा त्यांनी आपला मोबाईल फोन १३व्या मजल्यावरून खाली फेकला. मुंबई पोलिसांकडेही तक्रार दाखल करण्यात आली आहे. मात्र, ईडीच्या अधिकाऱ्यांनी नंतर तो मोबाईल फोन जप्त केला. तपास यंत्रणेच्या म्हणण्यानुसार, काही आर्थिक व्यवहारांसंदर्भात धर्मेश संगानी यांची अमेरिकेच्या सीमाशुल्क अधिकाऱ्यांकडूनही चौकशी सुरू आहे. याव्यतिरिक्त, अधिकाऱ्यांनी सांगितले की, सप्टेंबर २०१६ मध्ये ब्रिटिश बॉर्डर फोर्सने धर्मेश संगानी यांच्याकडून अंदाजे ७.४ किलोग्रॅम सोन्याचे दागिने जप्त केले होते. त्यांनी सोन्याचे प्रमाण कमी दाखवल्याचा आरोप होता. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

## वारकऱ्यांची सेवा हीच विठुरायाची सेवा : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**पुणे/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्यावतीने आयोजित 'श्री क्षेत्र पंढरपूर आषाढी वारी चरण सेवा' उपक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज भेट देऊन वारकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी वारकऱ्यांची सेवा हीच विठुरायाची सेवा असल्याचे सांगत अशा सेवाकार्यात सहभागी होणे हे मोठे भाग्य असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्या पालख्यांचे दर्शन घेऊन व आशीर्वाद घेऊन या सेवाकार्यात सहभागी होत असल्याचा विशेष आनंद आहे. वारीत सहभागी होणारे वारकरी भगिनी-बंधू दीर्घ पायी प्रवास करून येथे पोहोचतात. त्यांचा शारीरिक शीण दूर व्हावा, या उद्देशाने राबविण्यात येणारा 'चरण सेवा' उपक्रम अत्यंत स्तुत्य आहे.

वारकरी संप्रदायात प्रत्येकामध्ये माऊलीचे दर्शन घेतले जाते. एकमेकांच्या चरणी नम्रतेने वंदन करण्याची परंपरा ही समतेचा आणि भक्तीचा संदेश देणारी आहे. अशा वारकऱ्यांच्या चरणांची सेवा करण्याची संधी मिळणे हे मोठे भाग्य असून, विठुरायाच्या भक्तांची सेवा हीच विठ्ठलभक्ती असल्याचे त्यांनी सांगितले.

या उपक्रमात तरुण स्वयंसेवक मोठ्या समर्पित भावनेने वारकऱ्यांची सेवा करत असल्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी समाधान व्यक्त केले. या सेवाकार्यात सहभागी झालेल्या सर्व स्वयंसेवी संस्था, कार्यकर्ते आणि आयोजकांचे त्यांनी अभिनंदन केले. विशेषतः आमदार श्री. सुनील कांबळे व त्यांच्या सहकाऱ्यांच्या कार्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी कौतुक केले.

ग्रामविकास विभागामार्फत आधुनिक पद्धतीच्या चरण सेवा यंत्रांचीदेखील उपलब्धता करून देण्यात आली असून त्याद्वारे वारकऱ्यांना अधिक चांगली सुविधा मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले.

गेल्या काही वर्षांत आषाढी वारीच्या व्यवस्थापनात अनेक सकारात्मक बदल करण्यात आल्याचे सांगताना मुख्यमंत्री म्हणाले, वारकऱ्यांसाठी जर्मन हँगरची व्यवस्था, निर्मल वारी अभियान, प्रशस्त पालखी मार्ग अशा विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तसेच येत्या दोन ते तीन वर्षांत पंढरपूर कॉरिडॉरचे काम पूर्ण करण्याचा शासनाचा मानस असून, भविष्यात पंढरपूरचा विकास काशी, अयोध्या आणि उज्जैनप्रमाणे आदर्श धार्मिक क्षेत्र म्हणून करण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

# खरोळा मारहाण प्रकरणात सहा नव्या आरोपींची भर; एकूण आठ आरोपींवर गुन्हा

## व्हायरल व्हिडिओ, फिर्यादीचा पुरवणी जबाब आणि साक्षीदारांच्या माहितीच्या आधारे कारवाई; दोषींना पाठीशी घालणार नाही - लातूर पोलीस

**लातूर/प्रतिनिधी:** रेणापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील खरोळा येथे घडलेल्या गाजलेल्या मारहाण प्रकरणाचा तपास लातूर जिल्हा पोलीस अत्यंत बारकाईने करत असून, समाजमाध्यमांवर व्हायरल झालेल्या व्हिडिओचे तांत्रिक विश्लेषण, फिर्यादीचा पुरवणी जबाब आणि साक्षीदारांच्या जबाबांच्या आधारे या गुन्ह्यात आणखी सहा आरोपींची भर करण्यात आली आहे. त्यामुळे या प्रकरणातील आरोपींची एकूण संख्या आता आठ झाली आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, सचिन राऊतराव, संतोष राऊतराव, बबलू काळे, नितीन शिंदे, दत्ता जाधव, बालू सूर्यवंशी, गणेश भोपी आणि दर्शन भोपी यांनी अल्पवयीन मुलांना पाईप तसेच



लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

याशिवाय सर्व आरोपींनी मिळून फिर्यादीला लिंबाच्या झाडाला दोरीने बांधून ठेवले तसेच त्याच्या दोन मित्रांना शेडच्या खांबाला बांधून शिवीगाळ, मारहाण व जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप आहे. या संपूर्ण घटनेचा व्हिडिओ चित्रित करून तो समाजमाध्यमांवर प्रसारित केल्याचेही तपासात स्पष्ट झाले आहे.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंद्र मायने तसेच पोलीस निरीक्षक सुधाकर देडे यांच्या नेतृत्वाखाली मारहाण आणि चोरी या दोन्ही प्रकरणांचा सखोल तपास सुरू आहे.

तपासादरम्यान जे कोणी दोषी आढळतील त्यांच्याविरुद्ध कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा लातूर जिल्हा पोलीस प्रशासनाने दिला आहे.

संपादकीय...

## दरडी कोसळण्याचे प्रमाण जास्त

एकविसाव्या शतकातील तिसऱ्या दशकाची नोंद हवामान बदलांच्या भीषण परिणामांचा कालखंड अशी इतिहासात होणार, हे स्पष्ट होत चालले आहे. २०२४, २०२५ आणि यंदाचे वर्ष अशा तीन वर्षांमध्ये पृथ्वीवरील तापमानात झालेली लक्षणीय वाढ, त्यामुळे झालेले बदल, वाढत चाललेल्या नैसर्गिक आपत्ती हे सर्व मानवाच्या भविष्यातील अस्तित्वाबाबत चिंता निर्माण करणारे आहे. अल निनो आणि दुष्काळाच्या चर्चा दूर सारून मान्सूनने आता रौद्रावतार धारण केला आहे. ईशान्येकडील राज्यांसह महाराष्ट्र, गुजरात, केरळ, गोवा या सह्याद्रीच्या कुशीतील राज्यांमध्ये गेल्या चार ते पाच दिवसांत पावसाने थैमान घातले आहे. महाबळेश्र्वरमध्ये २४ तासांत पडलेला ५१३ मिलिमीटर पाऊस हा गेल्या १०० वर्षांतील विक्रम ठरला. डोंगरमाथ्यावर कमी काळात झालेल्या अतिवृष्टीमुळे भूस्खलनाच्या घटना मोठ्या प्रमाणावर घडताहेत. पुणे-मुंबई महामार्गावर मिसिंग लिंकजवळ कोसळलेली दरड हटवल्यानंतर १६ तासांनी हा मार्ग वाहतुकीसाठी खुला झाला. जम्मू-काश्मीरमध्ये ढगफुटीमुळे भूस्खलन झाले. केरळच्या वायनाड जिल्ह्यातील कल्लाडी येथे मोठे भूस्खलन झाले. येथील एका पुलाजवळ बोगद्याच्या बांधकाम क्षेत्रातून काढलेली माती आणि ढिगारे नियमांचे उल्लंघन करून तिथेच साठवून ठेवले होते. मान्सून सुरू होण्यापूर्वी, हा सगळा मातीचा ढिगारा सुरक्षित ठिकाणी हलवण्याचे आदेश प्रशासनाने दिले होते; मात्र कंत्राटदार कंपनीने या आदेशांना केराची टोपली दाखवली. मुसळधार पाऊस सुरू होताच ही माती आणि चिखल वेगाने खाली घसरला आणि प्रकल्पाच्या ठिकाणी काम करणाऱ्या मजुरांवर काळाने घाला घातला. या घटनेपूर्वी २४ तासांत जिल्ह्यात २२६ मिमी पाऊस नोंदवला गेला होता. स्थानिक नागरिकांच्या सतर्कतेमुळे तीन मजुरांचे प्राण वाचले, तरी अनेक कामगार अद्यापही ढिगाऱ्याखाली अडकल्याची भीती आहे. केरळचा जवळपास १७ हजार चौरस किलोमीटर प्रदेश पश्र्चिम घाटाच्या पश्र्चिम उतारावर असून तो भूस्खलनासाठी अत्यंत संवेदनशील मानला जातो. दख्खनच्या पठाराच्या दक्षिण टोकावर असल्याने वायनाड जिल्ह्याला याचा सर्वाधिक फटका बसतो. 'सेंटर फॉर अर्थ सायन्स स्टडीज'च्या संशोधनानुसार, वायनाड हा केरळमधील सर्वाधिक दरडप्रवण जिल्हा आहे. वायनाडचा समावेश भूकंपाच्या झोन ३ मध्ये होत असून या भागाला मध्यम स्वरूपाच्या भूगर्भीय हालचालींचा धोका कायम असतो. २०११ मध्ये ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ डॉ. माधव गाडगीळ समितीच्या अहवालात पश्र्चिम घाटातील हा परिसर पर्यावरणदृष्ट्या अत्यंत संवेदनशील घोषित केला होता. अशा नाजूक डोंगराळ भागात मोठे पायाभूत सुविधा प्रकल्प, रस्ते रुंदीकरण आणि दगडखाणींवर पूर्ण बंदी घालण्याची शिफारस केली होती; मात्र याकडे झालेले दुर्लक्ष आज मानवी जीवांवर बेतत असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. भूस्खलनाच्या धोक्याचा विचार करता जागतिक पातळीवर भारत पहिल्या पाच सर्वाधिक असुरक्षित देशांमध्ये आहे. भारताच्या बरोबरीने चीन, अमेरिका, इटली आणि स्वित्झर्लंडचा यामध्ये समावेश आहे. या सर्व देशांमध्ये विस्तृत पर्वतरांगा असल्याने तिथे दरडी कोसळण्याचे प्रमाण जास्त आहे. भारतात लोकसंख्येची घनता जास्त असल्यामुळे येथे होणारी जीवित आणि वित्तहानी इतर देशांच्या तुलनेत भीषण असते. भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षणच्या (जीएसआय) आकडेवारीनुसार, देशातील एकूण भूभागापैकी सुमारे १२.६ टक्के क्षेत्र म्हणजेच अंदाजे ४.२ लाख चौरस किलोमीटर या धोक्याच्या छायेत आहे. यामध्ये प्रामुख्याने ईशान्येकडील राज्ये, हिमालयीन पर्वतरांगा, पश्र्चिम घाट आणि कोकण किनारपट्टीचा समावेश होतो. पश्र्चिम घाटासारख्या संवेदनशील परिसंस्थेमध्ये पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी कडक नियम आणि पर्यावरणीय उपाययोजना लागू केल्या जात नाहीत, तोपर्यंत वायनाडसारख्या क्षेत्रांवरील हे संकट कायम राहणार आहे. भारतातील भूस्खलनाचा धोका मुख्यत्वे दोन मोठ्या भौगोलिक क्षेत्रांमध्ये विभागला आहे. उत्तर आणि उत्तर-पूर्व भारतातील हिमालयीन क्षेत्र हे भूगर्भीयदृष्ट्या तरुण आणि अस्थिर मानले जाते. दक्षिण भारतातील बराचसा भाग हा तीव्र उताराचा आहे. इथे भूकंपाचा धोका कमी असला, तरी मान्सूनमधील अतिवृष्टीमुळे माती धरून ठेवण्याची क्षमता संपते आणि अचानक डोंगरकडे कोसळतात. संवेदनशील डोंगराळ भागात रस्ते रुंदीकरण, ट्विन टनेलसारखे मोठे पायाभूत सुविधा प्रकल्प, अनधिकृत बांधकामे आणि मोठ्या प्रमाणावर होणारी वृक्षतोड यामुळे डोंगरांचे नैसर्गिक संतुलन बिघडले. पर्वतीय आणि डोंगराळ भागांत पर्यावरणीय संवेदनशीलतेकडे पूर्णपणे कानाडोळा करण्याचे घातक परिणाम अनुभवास येताहेत. वायनाडच्या प्रकरणात कंत्राटदारांनी उत्खनन केलेली माती वेळेवर हटवली नाही, असा आरोप आहे; परंतु हे केवळ एका ठिकाणचे चित्र नाही. संपूर्ण देशात कुठेही दुर्घटना घडल्यास कोणावरही कडक कायदेशीर कारवाई होत नाही किंवा कोणाचेही उत्तरदायित्व निश्र्चित केले जात नाही. महामार्ग किंवा बोगदे तयार करताना डोंगराचे उतार सरळ ९० अंशांत कापले जातात. वास्तविक, पर्वताचा नैसर्गिक कोन (अँगल ऑफ रिपोज) बदलल्यास तो उतार अस्थिर बनतो. तिथे संरक्षक भिंत उभारली नाही, तर पहिल्याच पावसात तो भाग कोसळण्याची शक्यता असते. पुणे जिल्ह्यात माळीण हे संपूर्ण गाव गाडले गेले होते. त्यानंतर ईर्शाळवाडीतील भूस्खलनाची दुर्घटना घडली. यंदा मावळमधील विसापूर किल्ल्याच्या पायथ्याशी पाटण गावावर ही आपत्ती ओढवली. आणखी किती मृत्यू आपण पाहणार आहोत? मागील आपत्तींमधून कसलाही बोध न घेता निसर्गावर चाल करून जाण्याची भूमिका घेतली जात आहे. पश्र्चिम घाटामध्ये जे ३७ टक्के जंगल शिल्लक आहे, ती टक्केवारी ८० वर्षांपूर्वी जवळपास ६८ ते ६९ टक्के होते. याचाच अर्थ गेल्या ८ दशकांत आपण पश्र्चिम घाटातील निम्मी वनसंपदा नष्ट केली. जंगलांमध्ये वणवे लागण्याच्या किंवा जाणूनबुजून लावण्याच्या घटना वाढत आहेत. खाणकामाचा विस्तार वाढत आहे. बांधकामाच्या दगडांसाठी डोंगर पोखरून सपाट केले जात आहेत. पर्यटनाच्या नावाखाली डोंगर उतारांवर मोठी बांधकामे केली जात आहेत. भूजलाचा अनिर्बंध उपसा केला जात आहे. यामुळे होणारी पर्यावरणाची हानी कधीही न भरून येणारी आहे. महाराष्ट्राच्या डोंगरदऱ्यातील अनेक जमिनींमध्येही अतिवृष्टीच्या काळात नैसर्गिकपणे तेवढे पाणी सामावून घेण्याची क्षमता राहिलेली नाही. पर्यावरणतज्ज्ञांच्या मते, येत्या काळात या आपत्ती वाढतच जाणारच आहेत. या आपत्तीग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी पैसा कमी पडेल इतकी प्रचंड हानी होण्याची भीती आहे. गेल्या चार-पाच वर्षांतील अनुभव या भीतीला पुष्टी देणारे आहेत, तरीही आपले विकासाचे बुलडोझर डोंगरांचे सपाटीकरण करत राहणार असतील आणि वृक्षांच्या खोडावर घाव घालणार असतील, तर भविष्यात काय स्थिती उद्भवू शकेल, याची कल्पनाच न केलेली बरी!

# '१०० सर्वाधिक प्रभावशाली महिलांचा सन्मान'

## महिला स्वयंसहायता गटांमुळे देशात क्रांती - राज्यपाल जिष्णु देव वर्मा

**मुंबई/प्रतिनिधी :** महिला स्वयंसहायता गटांमुळे देशातील महिलांच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय सक्षमीकरणाला गती लाभली असून ग्रामीण आदिवासी महिलांच्या जीवनात क्रांतिकारक बदल झाले आहेत. गावोगावींच्या महिलांमध्ये नेतृत्वगुण विकसित होत आहेत. हे कार्य अधिक जोमाने होण्यासाठी समाजातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचले पाहिजे, असे प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी आज येथे केले.

'फॉर्च्युन इंडिया' मासिकातर्फे देण्यात येणाऱ्या 'फॉर्च्युन इंडिया १०० मोस्ट पॉवरफुल वूमेन (सर्वाधिक प्रभावी महिला)' पुरस्काराचा आरंभ राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत १० जुलै रोजी मुंबई येथे झाला, त्यावेळी ते बोलत होते. केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री अनुप्रिया पटेल यांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात राज्यपालांच्या हस्ते 'फॉर्च्युन इंडिया' मासिकाच्या नव्या अंकाचे प्रकाशन करण्यात आले.

विविध क्षेत्रात नेतृत्वस्थानी असलेल्या महिलांना संबोधित करताना, राज्यपाल म्हणाले की, महिला स्वयंसहायता गटांमुळे स्वतःच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडवून इतरांना देखील प्रोत्साहन देणाऱ्या महिला अनेक ठिकाणी उदयास आल्या आहेत. पूर्वी बँकेत जाण्यास देखील घाबरणाऱ्या त्रिपुरा येथील एका ग्रामीण महिलेने कालांतराने स्वतः अधिकाऱ्यांसमोर आत्मविश्वासाने पॉवर पॉईंट सादरीकरण केले त्यावेळी सर्व उपस्थित आश्चर्यचकित झाले होते. ती महिला 'बँक सखी' म्हणून आज अनेक महिलांना मदत करीत असल्याचे त्यांनी सांगितले. महिलांकडील अनुत्पादक मालमत्तेचे प्रमाण (एनपीए) १ टक्क्यापेक्षाही कमी आहे. महिलांकडे गेलेला पैसे सुरक्षित असतो, असे त्यांनी सांगितले. देशातील ५० टक्के नागरिक महिला असल्यामुळे त्यांच्या विकासाकडे दुर्लक्ष करून 'विकसित भारता'चे लक्ष्य साध्य करता येणार नाही. त्यामुळे समाजातील शेवटच्या स्तरावरील महिलेपर्यंत पोहोचून तिचे सक्षमीकरण झाले पाहिजे, असे राज्यपालांनी सांगितले.

आज महिला तळागाळापासून ते उद्योग जगतातील मोठमोठ्या जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडत आहेत. विकास प्रक्रियेत त्या केवळ सहभागी होत नसून परिवर्तनाच्या अग्रस्थानी आहेत, असे प्रतिपादन केंद्रीय आरोग्य व कुटुंबकल्याण राज्यमंत्री अनुप्रिया पटेल यांनी यावेळी केले. यावेळी त्यांनी उपस्थितांना केंद्र शासनाच्या महिला सक्षमीकरणाच्या कार्याची माहिती दिली. मातेचे आरोग्य सुधारण्यासाठी तसेच माता मृत्युदर कमी करण्यासाठी केंद्र शासनाच्या कार्याची जागतिक स्तरावर दखल घेण्यात आल्याचे सांगून त्यांनी 'नारीशक्ती वंदन' अधिनियम व 'पोषण अभियान' उपक्रमाची माहिती दिली.

गर्भाशय मुखाच्या कर्करोगापासून महिलांचे रक्षण करण्यासाठी केंद्र शासनातर्फे एचपीव्ही लस देण्यात येत असल्याचे सांगून त्यांनी 'आयुष्मान भारत' योजना, 'जनऔषधी




औषधालये, लखपती दीदी, नमो ड्रोन आदी योजनांची माहिती दिली.

सुरुवातीला राज्यपालांच्या हस्ते 'फॉर्च्युन इंडिया' मासिकाच्या अंकाचे प्रकाशन करण्यात आले. आरपी संजीव गोयंका समूहाचे उपाध्यक्ष शाश्वत गोयंका यांनी प्रास्ताविक केले तर 'फॉर्च्युन इंडिया'चे मुख्य संपादक सौरव मुजुमदार यांनी आभार प्रदर्शन केले.

उदघाटन सत्राला नॅशनल स्टॉक एक्स्चेंजचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिषकुमार चौहान, रिलायन्स फाउंडेशनच्या अध्यक्षा नीता अंबानी, माजी केंद्रीय मंत्री स्मृती इराणी, कॉर्पोरेट लॉ फर्म एझेडबी अँड पार्टनर्सच्या सह संस्थापिका झिया मोदी, नीरजा बिर्ला यांसह उद्योग, व्यवसाय, बँकिंग क्षेत्रातील प्रभावी महिला उपस्थित होत्या.

## अनुसूचित जाती आरक्षणाचे दोन गटात उपवर्गीकरण करा: बगाडे

**लातूर/प्रतिनिधी :** सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जातीचे अ, ब, क, ड असे वर्गीकरण करण्याचे आदेश राज्य सरकारला दिले आहेत. परंतु, आरक्षण वर्गीकरण कृती समितीने त्याचे दोन गटात उपवर्गीकरण करण्याची मागणी लातुरात आयोजित पत्रकार परिषदेत शनिवारी केली. यावेळी समितीचे निमंत्रक सचिन बगाडे, संयोजक अरविंद पाटोळे, नागेश गायकवाड आदी उपस्थित होते.



आरक्षण वर्गीकरण मुद्द्याला घेऊन बगाडे व त्यांचे सहकारी पुणे येथून संपूर्ण महाराष्ट्रात आपली भूमिका मांडत असून, त्यानुसार त्यांनी शनिवारी लातूर पत्रकार परिषद घेतली. पत्रकारांशी संवाद साधताना बगाडे म्हणाले, राज्यात अनुसूचित जाती सामाजिक शैक्षणिक व आर्थिक दृष्ट्या एकसंघ नसून त्या विविध स्तरांत विभागल्या आहेत. प्रत्यक्षात काही मोठ्या जातींनी आरक्षणाचा मोठा लाभ घेतला असून, मातंग व तत्सम जाती आजही सर्व क्षेत्रात मागे राहिल्या आहेत. त्यामुळे उपवर्गीकरण करणे काळाची गरज आहे. कर्नाटक सरकारने सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर उपवर्गीकरणाची अंमलबजावणी केली आहे. विशेषतः हरियाणा राज्याने वंचित आणि अल्प प्रतिनिधित्व या निकषावर आधारित दोन गटांची प्रभावी रचना केली आहे. त्यानुसार महाराष्ट्र सरकारने अनुसूचित जातींचे दोन गट उपवर्गीकरणात करणे आवश्यक आहे. त्यात वंचित अनुसूचित जाती आणि इतर अनुसूचित जाती असा त्याचा प्रवर्ग असावा, असे बगाडे यांनी सांगितले.

उपवर्गीकरणाची सविस्तर मांडणी करताना बगाडे म्हणाले, अनुसूचित जातीसाठी असलेल्या १३ टक्के आरक्षणापैकी सहा टक्के आरक्षण वंचित अनुसूचित जातीसाठी राखीव ठेवावे, उर्वरित सात टक्के आरक्षण इतर अनुसूचित जातीसाठी ठेवण्यात यावे. जर एका गटात पात्र उमेदवार उपलब्ध नसेल तर दुसऱ्या गटातील उमेदवारास संधी देण्यात यावी. शैक्षणिक प्रवेशात दोन्ही गटांना प्रत्येकी सहा टक्के आरक्षण लागू करावे. उपवर्गीकरणानंतर पहिली रिक्त जागा वंचित अनुसूचित जातीसाठी देण्यात यावी.

आरक्षणाची दोन गटात विभागणी झाल्यानंतर समाजातील विषमता कमी करून खऱ्या अर्थाने सामाजिक न्याय प्रस्थापित होईल, असा दावाही यावेळी बगाडे यांनी केला.

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांची मोशी घटनास्थळी भेट; दोषींवर कारवाईचा इशारा

**पिंपरी-चिंचवड :** मोशी येथील कचरा डेपोमध्ये घडलेल्या भीषण दुर्घटनेनंतर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी शनिवारी घटनास्थळी भेट देत बचावकार्याचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी एनडीआरएफ, अग्निशमन दल, महापालिका प्रशासन आणि संबंधित अधिकाऱ्यांकडून सुरू असलेल्या शोध, बचाव मोहिमेची माहिती घेतली. त्यानंतर माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी ही घटना अत्यंत दुर्दैवी असल्याचं सांगत मृतांच्या कुटुंबीयांप्रती शासन संवेदनशील असल्याचं स्पष्ट केलं. घटनास्थळी अजूनही काही कर्मचारी अडकले असल्याची शक्यता व्यक्त करत त्यांनी सांगितलं की, त्यांचा शोध सुरू असून प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचण्यासाठी यंत्रणा सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. मात्र, कचऱ्याच्या ढिगाऱ्यात मोठ्या प्रमाणावर विषारी वायू असल्यामुळं बचाव पथकांना काम करताना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्याचबरोबर सततच्या पावसामुळंही शोध मोहिमेत अडथळे निर्माण होत असल्यानं विलंब होत असल्याचंही सुनेत्रा पवार यांनी स्पष्ट केलं.

परवा घडलेली ही घटना अत्यंत दुर्दैवी आहे. या दुर्घटनेत ज्यांचा मृत्यू झाला आहे, त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात शासन सहभागी आहे. प्रशासन पूर्ण संवेदनशीलतेने काम करत असून बचावकार्य युद्धपातळीवर सुरू आहे.

संपूर्ण प्रकरणाची चौकशी सुरू : दुर्घटनेच्या चौकशीबाबत बोलताना उपमुख्यमंत्री म्हणाल्या की, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी सुरू आहे. चौकशीअंती जे काही सत्य समोर येईल, त्यानुसार संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येईल. कोणालाही पाठीशी घातलं जाणार नाही, असा अप्रत्यक्ष इशाराही त्यांनी दिला. मृतदेह बाहेर काढल्यानंतर त्यांची योग्य ओळख पटवून ते नातेवाईकांना दाखवण्याबाबत प्रशासनानं अत्यंत संवेदनशीलतेनं काम करावं, अशा सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

# निसर्गाच्या प्रयोगशाळेतील एक जीवनप्रवास

सारे ऋतू माझ्यात उतरले, सारे रंग माझ्यात फुलले,

निसर्गाच्या त्या प्रयोगशाळेत, संस्कारांचे बीज उगवले.

निसर्ग हळूच हसून म्हणाला, ''सारे शिकलास तू आता...

मोठं होण्यापेक्षा, आधी फक्त 'माणूस'हो रे ताता!''



बालपणी आपण निसर्ग फक्त पाहतो; नद्यांत दगड मारतो, झाडांवर चढतो आणि फुलपाखरांच्या मागे धावतो. पण मोठे झाल्यावर आपण निसर्ग वाचायला शिकतो. तेव्हा लक्षात येते की, झाडे बोलत नाहीत, नद्या प्रवचन देत नाहीत आणि सूर्य कधीही व्यासपीठावर येऊन भाषण करत नाही, तरीही हे सारे घटक आपल्याला जगण्याचे सर्वात मोठे धडे देत असतात. निसर्ग ही एक अशी जिवंत प्रयोगशाळा आहे, जिथे माणूस घडण्याची प्रक्रिया निरंतर सुरू असते. जर आपण खऱ्या अर्थाने या घटकांशी संवाद साधला, तर लक्षात येईल की निसर्गातील प्रत्येक घटक आपल्याला माणूस होण्याचे निमंत्रण देत आहे.

झाड होऊन जगावे, असे वाटते तेव्हा लक्षात येते की, झाड स्वतःसाठी एकही फळ खात नाही. ते स्वतःच्या अंगावर ऊन झेलते, पण इतरांना सावली देते. जगण्याचा अर्थ स्वच्या पलीकडे जाऊन सर्व होण्यात असतो, हे झाड आपल्याला आपल्या शांत मुद्रेने शिकवते. उदारता आणि त्याग हे केवळ शब्द नसून ते जगण्याचे बळ आहेत, हे झाडाकडून शिकावे. तसेच, पर्वताकडे पाहावे. शिखरे कितीही उंच असली, तरी पर्वत आपल्या पायाशी असलेल्या दऱ्यांना धरून ठेवतो. वादळे येतात, पाऊस कोसळतो, ऊन-वारा थडकतो, पण पर्वत आपल्या तत्त्वांवरून हलत नाही. जीवनातही स्थैर्य आणि धैर्य असेल, तर आपत्तींचे रूपांतर संधीत करता येते.

कधी वाटतं, एखाद्या खळाळणाऱ्या झऱ्यासारखं व्हावं. झरा म्हणतो, ''अडथळा म्हणजे शेवट नाही.'' दगड आडवा आला की झरा रस्ता बदलतो, पण आपला प्रवाह थांबवत नाही. चिकाटी म्हणजे काय, हे या छोट्याशा झऱ्याकडून शिकावे. तर कधी सूर्यासारखं व्हावं. सूर्य कधी अंधाराशी भांडत नाही. तो फक्त उजेड देतो आणि अंधार आपोआपच आपली जागा सोडून पळ काढतो. आयुष्यातही इतरांच्या दोषांशी लढण्यापेक्षा, स्वतःच्या सकारात्मकतेचा प्रकाश इतका वाढवावा की नकारात्मकता आपोआप नष्ट होईल.

माणूस म्हणून घडताना ढग होणेही गरजेचे असते. ढग जेव्हा भरून येतात, तेव्हा ते स्वतःसाठी साठवून ठेवत नाहीत; ते बरसतात. दान आणि करुणा यांचे हेच स्वरूप आहे. पावसाचा एखादा थेंब किती लहान असतो, पण तहानलेल्या जिवासाठी तो अमृत असतो. आयुष्यात आपण मोठी कार्ये करत नाही, तरी चालेल; पण एखाद्याच्या डोळ्यातील पाणी पुसणारा एक छोटासा प्रयत्नही पावसाच्या थेंबासारखा मोलाचा असतो. वाऱ्यासारखे निःस्वार्थ असावे. वारा कोणाला दिसत नाही, पण तो स्पर्शातून ओळखला जातो. तसाच आपला सेवाभाव असावा, जो कोणालाही न दाखवता, फक्त अनुभवायला असावा.

केव्हा कधी एखादी मंद झुळूक होऊन जावे. खूप मोठा बदल नेहमी गडगडाटाने होत नाही, कधी तो झुळुकीच्या हळुवार स्पर्शानेही घडतो. हीच संवेदनशीलता माणसाला माणसाशी जोडते. विविधतेत एकता शोधण्यासाठी इंद्रधनुष्याकडे पाहावे. सात रंग वेगळे आहेत, पण जेव्हा ते एकत्र येतात, तेव्हाच सौंदर्य जन्मते. समाजातही विचारांची विविधता असावी, पण माणुसकीच्या धाग्याने आपण एकत्र असायला हवे. नदी साक्षात गुरु आहे; ती कधीही मागे वळून पाहत नाही, म्हणूनच ती समुद्रापर्यंत पोहोचते. भूतकाळात रमून जाण्यापेक्षा, सतत पुढे वाहत राहणे, म्हणजेच सतत शिकत राहणे हीच नदीची जीवनगाथा आहे.

चांदणे सांगते की, अंधार संपवण्यासाठी प्रत्येक वेळी सूर्यच व्हावे लागते असे नाही; कधीकधी काजव्यासारखा किंवा चांदण्यासारखा छोटासा उजेडही दिशा दाखवण्यासाठी पुरेसा असतो. आणि दवबिंदू? तो क्षणभराचा असतो, पण पहाटेची शोभा वाढवून जातो. आयुष्यात आपण किती वर्षे जगलो, यापेक्षा ते किती सुंदर जगलो, हे महत्त्वाचे. फुलपाखरू तर आत्मपरिवर्तनाचा सर्वात मोठा धडा आहे. कोष सोडून बाहेर येताना होणारी वेदना सोसल्याशिवाय त्याला पंख मिळत नाहीत. त्याचप्रमाणे, जुन्या विचारांच्या कोशातून बाहेर पडल्याशिवाय माणसाला विचारांची भरारी घेता येत नाही.

या प्रवासात आपण बांबूच्या झाडाचा दृष्टांत लक्षात ठेवला पाहिजे. बांबू सुरुवातीला अनेक वर्षे जमिनीच्या खाली आपली मुळे घट्ट करत असतो. वरून पाहणाऱ्याला वाटते, याची वाढच होत नाहीये. पण एकदा का मुळे भक्कम झाली की, तो अवघ्या काही दिवसांत आकाशाला गवसणी घालतो. माणसाचेही तसेच आहे; जर मूल्यांची आणि संस्कारांची मुळे भक्कम असतील, तर यशाची उंची आपोआप मिळते. दिवा जसा स्वतःची ज्योत दुसऱ्याला देताना कमी होत नाही, उलट उजेड वाढवतो, तसे ज्ञान आणि प्रेम वाटल्यानेच वाढते.

आयुष्याच्या अंती आईने दिलेला तो संदेश आठवतो. तिने कधीही ''मोठा माणूस हो'' असे म्हटले नाही, तर ''आधी माणूस हो'' असे म्हटले. ती म्हणायची, ''झाड व्हायचं असेल तर आधी सावली द्यायला शिक, सूर्य व्हायचं असेल तर आधी स्वार्थाची राख करायला शिक आणि नदी व्हायचं असेल तर प्रवाहाला अर्थ द्यायला शिक.''

खरं तर, निसर्गातील प्रत्येक घटक आपल्याला रोज घडवत होता, शिकवत होता; पण ऐकणारा आणि पाहणारा माणूस मीच नव्हतो. निसर्ग हा मानवाच्या प्रगतीचा मार्गदर्शक आहे. पद, प्रतिष्ठा आणि पैसा हे तर काळाच्या ओघात गळून पडणारे अलंकार आहेत. पण झाडाची उदारता, नदीची गतिशीलता आणि सूर्याची सकारात्मकता ज्याच्याकडे आहे, तोच खरा माणूस म्हणून शोभून दिसतो. आज निसर्गाच्या या प्रयोगशाळेतून बाहेर पडताना, मला एकच मंत्र सोबत घेऊन जायचा आहे ''आता मला फक्त जगण्याचे तंत्र नाही, तर माणूस होण्याचे तत्त्व उमजले आहे.'' कारण अखेरीस, या विश्वात आपण कोणत्या नावाने ओळखले जातो, यापेक्षा आपण माणूस म्हणून किती अर्थपूर्ण जगलो, हेच जास्त महत्त्वाचे आहे.



**राहूल हरिभाऊ इंगळे-पाटील**
**मोबाईल ९८९०५७७१२८**

# नवी मुंबई मनपा, महावितरण यांच्या गलथान कारभारामुळे दोन मुलींना विजेचा शॉक

## नऊ दिवस उलटून गेले तरीही दोषी कंत्राटदाराचा शोध लागला नसल्याने पालकांचा संताप

**नवी मुंबई / के. एच. हनवते :** एक जुलै रोजी नेरूळ (एलपीब्रिज) परिसरातील विद्युत प्रवाह दुर्घटनेत बेशुद्ध झालेल्या दोन्ही विद्यार्थ्यांची प्रकृती आता स्थिर (दोन दिवस बेशुद्ध) विजेच्या धक्क्याने जखमी झालेल्या महाविद्यालयीन दोन्ही विद्यार्थ्यांना आर्थिक मदत करा..!




नेरूळ (एलपीब्रिज) खाली गेल्या एक जुलै रोजी धुवांधार पावसात पाणी साचले व त्या ठिकाणी इलेक्ट्रिक केबल पाण्यात उतरले असल्यामुळे महाविद्यालयीन विद्यार्थिनी नेहमीप्रमाणे कॉलेजला जात असताना गुडघाभर पाण्यात विजेचा शॉक लागल्याने कुमारी : उज्वला वाघ व कुमारी : शुभांगी सुभाष बलखंडे या दोन मुली गंभीरित्या जखमी झाल्या असून त्यांच्यावर हॉस्पिटलमध्ये उपचार करण्यात आले, सदर पिढीत मुलींना आर्थिक मदत मिळावी, तसेच एरोली येथील दोन गर्भवती महिलांना चुकीचे इंजेक्शन देऊन दोन महिला पैकी एक गर्भवती महिला मृत्यू पावलेली आहे त्यांना पण आर्थिक मदत मिळालीच पाहिजे, अशा नवी मुंबई महानगरपालिकेच्या ढिसाळ कारभाराचा आम्ही जाहीर निषेध करतो, आयुक्तांनी या सर्व प्रकरणाची जिम्मेदारी घेऊन ताबडतोब राजीनामा द्यावा इत्यादी मागण्या घेऊन नवी मुंबई महानगरपालिकेवर दिनांक: ७/७/२०२६ रोजी नवी मुंबई महानगरपालिके चे आयुक्त : डॉ. कैलास शिंदे यांना निवेदन देण्यासाठी गेलो असता नेहमीप्रमाणे डॉ. कैलास शिंदे हे त्यांच्या दालनात उपस्थित नसल्याचे दिसून आले, तीन दिवसांपूर्वी रिस्तर त्यांची अपॉइंटमेंट घेऊन गेलो होतो, तरीसुद्धा त्यांनी आमची भेट घेतली नाही त्यामुळे अतिरीक्त आयुक्त पवार साहेब हे आयुक्तांच्या दालनामध्ये येऊन त्यांनी आमचे निवेदन स्वीकारले.

याप्रसंगी रिपब्लिकन सेना नवी मुंबई व रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (दीपक भाऊ निकाळजे) या दोन पक्षांच्या संयुक्त विद्यमाने निवेदन देण्यात आले. सदर निवेदनात दिलेल्या मागण्या व माहिती आठ दिवसाच्या आत मध्ये आयुक्तांनी आपल्याला लेखी स्वरूपात द्यावी अशा प्रकारचे आवाहन केले आहे जर का आठ दिवसांमध्ये लेखी स्वरूपात माहिती व मागणी मान्य झाल्या नाहीत तर रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष सर सेनानी : आनंदराज आंबेडकर व युवा नेते एडवोकेट अमन आंबेडकर यांच्या आदेशाने नवी मुंबई महानगरपालिकेवर प्रचंड प्रमाणात मोर्चा आणण्यात येईल व या मोर्चामध्ये काही प्रकार घडले तर त्याची पूर्णत:हा जबाबदारी महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांची असेल याची नोंद घ्यावी. यावेळी दोन्ही पक्षाच्या कार्यकर्त्यांची प्रचंड उपस्थिती होती.

दोन्ही पक्षांच्या सर्व कार्यकर्त्यांचे रिपब्लिकन सेना नवी मुंबई जिल्हाध्यक्ष : वीरेंद्र (भाऊ) लगाडे आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (दीपक भाऊ निकाळजे) नवी मुंबई जिल्हाध्यक्ष : राजेंद्र (दादा) गायकवाड यांच्या वतीने जाहीर आभार व धन्यवाद व्यक्त केले, अशाच प्रकारे आपण सारे नवी मुंबईतील आंबेडकरवादी एकत्र येऊन यापुढील आंबेडकरी विचारांचे काम करू व सर्वसामान्य जनतेला न्याय मिळवून देऊ..!

### ना प्रोफेसर, ना विद्यार्थी तरीही कॉलेज सुरु! राज्यात १२३ बोगस कॉलेज, सरकारचीच कबुली

**मुंबई/प्रतिनिधी :** शिकवणारे प्राध्यापक नाहीत, शिकणारे विद्यार्थी नाहीत तरीही महाविद्यालये सुरु असल्याचा प्रकार महाराष्ट्रात समोर आला आहे. विशेष म्हणजे ही अशाप्रकारेची एक दोन नव्हे तर तब्बल १२३ महाविद्यायले राज्यात असल्याची कबुली विधान परिषदेमध्ये सरकारनेच दिली आहे. राज्यात १२३ बोगस महाविद्यालये सुरू आहेत असं सांगतानाच राज्य सरकारने ही महाविद्यालये कायद्याने आवश्यक असलेले किमान निकष पूर्ण न करता चालवली जात असल्याचंही नमूद केलं आहे.

सर्वेक्षणातून समोर आली माहिती

किमान विद्यार्थी पट नाही, पात्र प्राध्यापक नाहीत, त्याचप्रमाणे शिक्षणासाठी आवश्यक प्रयोगशाळा, ग्रंथालये, मैदाने या सुविधाही नसलेली १२३ बोगस महाविद्यालये राज्यात सुरू असल्याची बाब उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या सर्वेक्षणातून समोर आली आहे. सरकारनेच याविषयीची कबुली दिल्याने या महाविद्यालयांत शिकणाऱ्या शेकडो विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. या विद्यार्थ्यांचे भविष्य टांगणीला लागले आहे.

बोगस महाविद्यालयांविषयी निरंजन डावखरे यांनी विधान परिषदेतील चर्चेदरम्यान तारांकित प्रश्न उपस्थित केला. विद्यापीठांकडून संलग्नता प्रदान करताना किंवा तिचे नूतनीकरण करताना निकषांचे पालन होते की नाही याची खातरजमा करण्यासाठी शासनाकडून कोणती यंत्रणा कार्यरत आहे, बोगस महाविद्यालयांवर कोणती कारवाई करण्यात येते असा सवालही डावखरे यांनी उपस्थित केला. यावर उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी उत्तर दिले. यावरील लेखी उत्तरात पाटील यांनी कायद्यानुसार अनिवार्य निकष पूर्ण न करणाऱ्या राज्यातील महाविद्यालयांची यादी सादर केली. राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये विविध विद्यापीठांशी संलग्न असलेल्या महाविद्यालयांमध्ये आवश्यक भौतिक सुविधा नाहीत. या महाविद्यालयांनी विविध राज्य सार्वजनिक विद्यापीठांतर्गत शासन निर्णयाद्वारे विहित केलेल्या निर्णयांची निकषांची पूर्तता केलेली नाही. अशा अनेक विद्यापीठांशी संलग्न असलेल्या या बोगस महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना योग्य शिक्षण आणि प्रमाणपत्र मिळण्याची शक्यता कमी असल्याचं सांगितलं जात आहे.

विशेष म्हणजे यातील सर्वाधिक बोगस महाविद्यालये छत्रपती संभाजीनगरमध्ये आहेत. या १२३ पैकी अर्ध्याहून अधिक महाविद्यालये छत्रपती संभाजीनगरमध्ये असून ही संख्या ८१ इतकी आहे. त्या खालोखाल अमरावतीमध्ये २०, नागपूरमध्ये १२, नाशिकमध्ये ५ बोगस महाविद्यालये आहेत. त्याचप्रमाणे पुण्यात ३, कोकणात २ बोगस महाविद्यालये आहेत. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १०८ (संलग्नता आणि मान्यतेच्या अटी), कलम ११७ (तपासणी) कलम १२० (मान्यता रद्द करणे) अंतर्गत कारवाई केली जात असल्याची माहितीही चंद्रकात पाटील यांनी विधान परिषदेत दिली.

### मोशी इमारत दुर्घटना : मृतांच्या नातेवाईकांना आर्थिक मदत आणि नोकरीची घोषणा

**पिंपरी–चिंचवड :** मोशी येथील कचरा डेपो परिसरात घडलेल्या भीषण इमारत दुर्घटनेनंतर मृतांच्या कुटुंबीयांना दिलासा देण्यासाठी विविध स्तरावरून आर्थिक मदतीच्या घोषणा करण्यात आल्या आहेत. प्रकल्प चालवणाऱ्या अँटोनी वेस्ट ग्रुपकडून मृतांच्या नातेवाईकांना प्रत्येकी २५ लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात येणार असून, कुटुंबातील एका इच्छुक सदस्याला कंपनीमध्ये नोकरी देखील दिली जाणार आहे. याशिवाय जखमी कर्मचाऱ्यांच्या उपचाराचा संपूर्ण खर्च कंपनी उचलणार असून, मृतांच्या लहान मुलांच्या शिक्षणाची जबाबदारीही कंपनीने स्वीकारली आहे. या दुर्घटनेमुळं अनेक कुटुंबांवर दु:खाचा डोंगर कोसळला असून, त्यांना आर्थिक आधार मिळावा आणि भविष्यातील उपजीविकेची चिंता कमी व्हावी, या उद्देशाने ही मदत जाहीर करण्यात आली आहे. कंपनीच्या या निर्णयामुळं काही प्रमाणात का होईना, प्रभावित कुटुंबांना दिलासा मिळणार असल्याची भावना व्यक्त होत आहे.पिंपरी–चिंचवड महापालिका प्रशासनाकडून मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी १० लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर करण्यात आली आहे. तसंच राज्य सरकारकडूनही प्रत्येकी ५ लाख रुपयांची मदत देण्याची घोषणा करण्यात आली आहे. त्यामुळं प्रत्येक मृताच्या कुटुंबाला विविध माध्यमांतून मोठ्या प्रमाणात आर्थिक सहाय्य मिळणार आहे. महापौर रवी लांडगे यांनी दुर्घटनास्थळी भेट देऊन बचावकार्याचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी बचाव पथकांकडून सुरू असलेल्या कामाची माहिती घेतली. तसेच संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या. दुर्घटनास्थळावरील मलबा हटविण्याचं आणि शोधकार्याचं काम युद्धपातळीवर सुरू असून, हे काम संध्याकाळपर्यंत पूर्ण होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

दुर्घटना नेमकी कशामुळं घडली : याचबरोबर या दुर्घटनेच्या कारणांची सखोल चौकशी केली जाईल, असंही महापौरांनी स्पष्ट केलं. इमारत दुर्घटना नेमकी कशामुळं घडली, त्यामागे कोणाचा निष्काळजीपणा किंवा नियमांचे उल्लंघन आहे का?, याची तपासणी केली जाईल. चौकशीत जे कोणी दोषी आढळतील त्यांच्यावर कोणतीही दया न दाखवता कडक कारवाई करण्यात येईल, असं आश्वासन त्यांनी दिलं. मोशी येथील या दुर्घटनेने संपूर्ण पिंपरी–चिंचवड शहर हादरलं असून, प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरही अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. अशा दुर्घटना पुन्हा घडू नयेत यासाठी सुरक्षा नियमांची काटेकोर अंमलबजावणी आणि संबंधित यंत्रणांची जबाबदारी निश्चित करण्याची मागणी विविध स्तरांतून होत आहे. दरम्यान, बचावकार्य पूर्ण झाल्यानंतर चौकशी अहवालाच्याआधारे पुढील कारवाई केली जाणार असल्याचं प्रशासनानं स्पष्ट केलं आहे.

### कोयना धरण ५० टक्क्यांच्या उंबरठ्यावर; १०० टक्के भरण्यासाठी अजून ५२.१२ टीएमसी पाण्याची प्रतीक्षा

**कराड :** पश्चिम घाटात पावसाचा जोर काहीसा ओसरल्याने कोयना धरणातील पाणी साठ्याच्या वाढीचा वेग मंदावला आहे. तरीही, जुलै महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत धरणाने निम्म्याहून अधिकचा टप्पा यशस्वीपणे गाठला आहे. धरणातील आजची (शनिवार, ११ जुलै २०२६) स्थिती समाधानकारक असली, तरी पूर्ण क्षमतेने भरण्यासाठी पाणलोट क्षेत्रात पुन्हा एकदा दमदार पावसाची आवश्यकता आहे.

कोयना धरणाची पूर्ण क्षमता गाठण्यासाठी अजून सुमारे ५२.१२ टीएमसी पाण्याची गरज आहे. सध्या धरणात ५२.८८ टीएमसी साठा झाला असला, तरी १०० टक्के भरण्यासाठी पावसाचा जोर वाढणे गरजेचे आहे. गेल्या २४ तासांत कोयना पाणलोट क्षेत्रात पावसाने विश्रांती घेतल्याचे दिसून येते. कोयना परिसरात अवघा २ मिमी, नवजामध्ये १ मिमी, तर महाबळेश्वर येथे केवळ ९ मिमी पावसाची नोंद झाली आहे. पाणलोट क्षेत्रात पावसाचा जोर कमी झाल्यामुळे धरणात येणाऱ्या पाण्याची आवक मर्यादित राहिली आहे.

### थायलंडमधील रस्ते अपघातात निधन पावलेल्या नऊ भंतेजींना शिवडीत विभागाच्या वतीने मानवंदना

**शिवडी/रामदास धो. गमरे :** थायलंडमध्ये धम्मप्रचाराच्या कार्यात समर्पित असलेल्या नऊ भंतेजींचे रस्ते अपघातात दुर्दैवी निधन झाल्याची घटना संपूर्ण बौद्ध समाजासाठी अत्यंत वेदनादायी ठरली असून सदर दु:खद घटनेबद्दल जगभरातून शोकभावना व्यक्त होत आहे, त्याच पार्श्वभूमीवर शिवडी विभागातील सामाजिक कार्यकर्ते नाना कदम यांनी समाजातील विविध क्षेत्रातील कार्यकर्त्यांना एकत्र आणून शिवडी क्रॉस रोड, रेल्वे गेट क्र. ६ येथे दिवंगत भंतेजींना सामूहिक आदरांजली अर्पण करण्यासाठी अभिवादन सभेचे आयोजन केले.




सदर प्रसंगी आदर्श बौद्धाचार्य प्रविण तांबे यांनी त्रिशरण, पंचशील व धार्मिक पूजापाठाने करून कार्यक्रमास सुरुवात केली, तद्नंतर कामगार नेते राजाराम जाधव यांनी साश्रूनयनांनी सूत्रसंचालन करीत असताना दिवंगत भंतेजींच्या धम्मसेवेच्या कार्याचा गौरवपूर्ण आढावा घेतला.

प्रास्ताविकात त्यांनी या दु:खद घटनेबद्दल तीव्र शोक व्यक्त करत भंतेजींच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन केले.

सदर अभिवादन सभेस रविभाऊ गरुड, माजी नगरसेवक सुनील मोरे, बौद्धजन पंचायत समिती, शिवडी विभाग गट क्र. १३ चे कार्याध्यक्ष संतोष जाधव, बौद्धाचार्य भिकाजी जाधव, सर्वोच्च न्यायालयाचे ॲड. यशवंत गंगावणे, सुधीरभाऊ शार्दुल, संजय कसबे, प्रविण तांबे, नलेश गवारे, संतोष लोखंडे, सचिन गायकवाड, अनंत जाधव, पायल खरे तसेच विविध सामाजिक, धार्मिक व आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते या सर्वांनी दिवंगत भंतेजींच्या जड अंतःकरणाने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

सरतेशेवटी प्रविण तांबे यांनी उपस्थितांचे आभार मानत, दिवंगत भंतेजींनी मानवकल्याण व धम्मप्रसारासाठी दिलेले योगदान सदैव प्रेरणादायी राहील अशी भावना व्यक्त केली व दोन मिनिटे मौन पाळून अभिवादन सभेची सांगता करण्यात आली.

### राज्यात नव्या मुख्यमंत्रिपदाच्या नावाची चर्चा, मंत्री गिरीश महाजन थेटच बोलले

**जळगाव/प्रतिनिधी :** राज्याचे ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी विविध राजकीय घडामोडींवर भाष्य करत विरोधकांवर जोरदार टीका केली. खासदार संजय राऊत यांच्या मुख्यमंत्रिपदाबाबतच्या वक्तव्यांवर प्रतिक्रिया देताना महाजन यांनी उपरोधिक शैलीत राऊत यांच्यावर निशाणा साधला.

संजय राऊतांवर हल्लाबोल – संजय राऊत यांना मुख्यमंत्री कोण होणार हे ठरवण्याचे अधिकार कोणी दिले? असा सवाल उपस्थित करत महाजन म्हणाले, ‘‘भाजपाच्या दिल्लीतील नेत्यांनी पक्षाचे सर्वाधिकार संजय राऊत यांनाच दिले आहेत, असेच वाटते. देशाचा कारभारही तेच पाहत आहेत असे दिसते. उद्धव ठाकरे यांना पंतप्रधान बनवत आहेत, तर मुख्यमंत्रिपदासाठी चंद्रशेखर बावनकुळे यांचे नाव घेत आहेत. कोण मुख्यमंत्री होणार किंवा होणार नाही, हे ठरवण्याचे अधिकार राऊत यांना कोणी दिले?‘‘

मुख्यमंत्रिपदासाठी चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नावाबाबत विचारले असता, ‘‘बावनकुळे मुख्यमंत्री झाले तर त्यात वाईट काय आहे?‘‘ असे सांगत त्यांनी संजय राऊत यांना शुभेच्छाही दिल्या. ‘‘मलाही आता संजय राऊत यांना भेटावे लागेल,‘‘ अशी मिश्कील टिप्पणी त्यांनी केली.

राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे या दोन मतदारसंघातून लोकसभा निवडणूक लढवणार असल्याच्या चर्चेबाबत महाजन म्हणाले, लोकसभा निवडणुकीला अजून बराच वेळ आहे. पुढच्या निवडणुकीत काय निकाल लागतो ते पाहू. त्यांनी कुठल्या मतदारसंघातून निवडणूक लढवावी हा त्यांचा निर्णय आहे. तोपर्यंत अनेक राजकीय घडामोडी घडू शकतात.

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नागपूर दौऱ्याबाबत बोलताना महाजन म्हणाले, ‘‘उद्धव ठाकरे नागपूरला जाऊ द्या, मुंबईला जाऊ द्या किंवा रामटेकला जाऊ द्या, त्याचा काही उपयोग होणार नाही. ज्यांनी प्रभू श्रीरामांना विरोध केला त्या काँग्रेसच्या मांडीवर ते जाऊन बसले आहेत. त्यामुळे ते कुठेही गेले तरी जनता त्यांना स्वीकारणार नाही.

## प्रामाणिक, जबाबदार, कर्तव्यदक्ष आणि प्रशिक्षित कार्यकर्त्यांच्या बळावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित समाजाची स्वप्नपूर्ती शक्य आहे : बी. बी. मेश्राम

### प्रा. विलास कटारे यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त सपत्नीक जाहीर सत्कार समारंभ उत्साहात संपन्न

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन व कटारे मित्रपरिवार यांच्या संयुक्त विद्यमाने गांधी भवन छत्रपती संभाजी नगर येथे ११ जुलै २०२६ ला प्रा. विलास कटारे यांच्या सेवानिवृत्ती निमित्त जाहीर सत्कार समारंभ संपन्न झाला.

अध्यक्षीय समारोपात फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीचे कार्य करीत असताना त्यांनी ९ मार्च १९२४ ला दिलेला त्रिसूत्री संदेश म्हणजे ‘‘सुशिक्षित करा, संघर्ष करा आणि संघटित व्हा‘‘ व २० जुलै १९४२ ला नागपूर परिषदेत दिलेला विस्तारीत पंचसूत्री संदेश म्हणजे ‘‘सुशिक्षित करा, संघर्ष करा, संघटित व्हा, आत्मविश्वास बाळगा आणि कधी धीर सोडू नका‘‘ याची जाणीव ठेवून आपण मार्गक्रमण केले पाहिजे. चळवळ केवळ गतिमान करून चालणार नाही तर वेगाने गतिमान करावे लागेल, ज्यात दिशाही अंतर्भूत असेल. खंत व्यक्त करणाऱ्यांनी त्याची पूर्तता होण्यासाठी किंमत मोजावी लागत असते याचे जान आणि भान ठेवले पाहिजे. ज्या समाजातील नेतृत्वाला आपली माणसे आपल्याला मतदान करीत नाहीत असे वाटते त्यांनी २९ मार्च १९३६ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ‘‘मत विकणे हा गुन्हा तर आहेच शिवाय तो आत्मघातही आहे.‘‘ असा संदेश दिला होता, त्याचे मर्म आपण त्या समाजाला समजावून सांगू शकलो काय? करिता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अपेक्षिल्याप्रमाणे ‘‘ट्रेनिंग स्कूल फॉर एंट्रन्स टू पॉलिटिक्स‘‘ ची अंमलबजावणी केली पाहिजे. जेणेकरून चळवळीसाठी आवश्यक प्रामाणिक, जबाबदार, कर्तव्यदक्ष आणि प्रशिक्षित कार्यकर्ते उपलब्ध होऊ शकतील. परिणामी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अपेक्षांची स्वप्नपूर्ती केली जाऊ शकेल.

पुढील काळात प्रा. विलास कटारे यासाठी आपले जीवन समर्पित करतील. करिता त्यांना आनंददायक, निरोगी, दीर्घायुष्य लाभो तसेच त्यांच्या संपूर्ण परिवाराला भविष्यकालीन वाटचालीसाठी कोटी कोटी मंगल कामना व्यक्त केल्या. उद्घाटनपर मार्गदर्शन करताना आंबेडकरी विचारवंत प्रा. डॉ. ऋषिकेश कांबळे



म्हणाले की, हा केवळ सेवापूर्ती नव्हे तर कृतज्ञता सोहळा आहे. १९७९ नंतर आंबेडकराईट चळवळीचे नेतृत्व करणारे व्यक्ती हे गंगाधर गाडे साहेबाची देण आहे. त्यातील एक व्यक्तिमत्व म्हणजे प्रा. विलास कटारे होय. संघटना असली की देश विकता येतो, विकत घेता येतो एवढेच नव्हे तर गहाणही ठेवता येतो. करिता निर्णय प्रक्रियेत जाऊन अंमलबजावणी करण्यासाठी संघटित होणे आवश्यक आहे.

याप्रसंगी रमेश दादा गायकवाड म्हणाले डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित असणारा समाज घडविण्याचे कार्यात प्रा. विलास कटारे यांचा मोलाचा वाटा आहे. दलित पँथर हे वैचारिक विद्रोही संघटना होती ज्यात गंगाधर गाडे साहेब सोबत प्राध्यापक विलास कटारे कार्यरत होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीच्या संचालिका सूर्यकांता गाडे मॅडम म्हणाल्या की, आपण जर एकत्रपणे संघटित होऊ शकलो नाही तर पुढील पिढ्यांना वाईट दिवस येतील. गंगाधर गाडे साहेबांनी त्यांच्या कार्य काळात ‘‘दे दान सुटे गिराण‘‘ याप्रमाणे कार्य केले होते.

सत्कार समारंभात मनोगत व्यक्त करताना सत्कारमूर्ती प्रा. विलास कटारे म्हणाले की, समाजात काम करीत असताना समाजाच्या आस्था आणि अपेक्षांना तडा जाऊ नये, याची दक्षता बाळगली पाहिजे. सर्वांच्या खंत पूर्णत्वासाठी सर्वांची मोट बांधून सामाजिक एकजूट करावी लागेल.

याप्रसंगी प्रकाश कांबळे, अंबादास रगडे, निवृत्ती दहिफळे, योगेश ठाकूर, सुभाष मोकळे, परशुराम सोनवणे, भारतीय क्रांती दलाचे शैलेंद्र मिसाळ, माजी नगरसेवक मिलिंद दाभाडे, एकलव्य संघटनेचे संस्थापक पवन सोनवणे, रमेशदादा गायकवाड, नगरसेविका प्रेमलता दाभाडे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. सर्व उपस्थितानी व विविध पक्ष संघटनांच्या कार्यकर्त्यांनी प्रा. विलास कटारे यांचा सापत्नीक सत्कार केला.

प्रास्ताविक सुभाष ठोकळ, सूत्रसंचालन शशिकांत काळे तर आभार मिलिंद बागुल यांनी व्यक्त केले. तर कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी डॉ. कल्पना गंगावणे, डॉ. जोगेंद्र पाचगावकर, ॲड. सुनीलकुमार नागवंश, ॲड. विलास रामटेके, ॲड. राजू बागुल, वरिष्ठ संशोधन अधिकारी चंदा मगर यांनी विशेष परिश्रम घेतले.

## प्रा.डॉ. ज्योती पाटील-भोसले यांचा गणित विषयात पीएच. डी. पदवी प्राप्तीबद्दल सत्कार



**औसा /प्रतिनिधी :** येथील श्री.कुमारस्वामी महाविद्यालयातील गणित विभागातील प्रा. डॉ.ज्योती पाटील - भोसले यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड यांनी सम कॉन्ट्रीब्युशन्स टू सॉल्व इंटिग्रो डिफरन्सियल इक्वेशन्स या विषयावर सादर केलेल्या शोध प्रबंधास विद्यापीठाने मान्यता देऊन प्रा.डॉ. ज्योती पाटील - भोसले यांना गणित विषयात पीएच. डी. पदवी प्रदान करण्यात आली. त्यांना संशोधक मार्गदर्शक म्हणून महात्मा बसवेश्वर महाविद्यालय,लातूर येथील गणित विभाग प्रमुख डॉ. सुजित एस. हांडीबाग यांनी मार्गदर्शन केले.

शिक्षण क्षेत्रातील सर्वोच्च पीएच.डी. (विद्यावाचस्पती) पदवी संपादन केल्याबद्दल द वर्ल्ड स्कूल इंडिया, औसा परिवाराच्या वतीने डॉ. ज्योती पाटील (भोसले) यांचा शाल,श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन हृद्यसत्कार सत्कार करण्यात आला. या सत्कार समारंभास संस्थापक अध्यक्ष गणेश पाटील, उपप्राचार्या डॉ.कुसुम ढोणे, योगेश कदम, विनोद गोरे, निलेश पवार, औटी मॅडम, लोहारेकर मॅडम, साळुंखे मॅडम, पवार मॅडम, दुड्डे मॅडम, कात्रे मॅडम, विजयकुमार हासुबे तसेच द वर्ल्ड स्कूल इंडिया, औसा येथील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. डॉ. ज्योती पाटील या औसा येथील नामांकित विधिज्ञ स्वर्गीय ॲड. हनुमंतराव भोसले यांच्या कन्या आहेत.

वडिलांकडून मिळालेल्या प्रेरणेला न्याय देत, अथक परिश्रम, जिद्द, सातत्यपूर्ण संशोधन आणि ज्ञानसाधनेच्या बळावर त्यांनी गणित विषयात पीएच.डी. ही सर्वोच्च शैक्षणिक पदवी प्राप्त करून आपल्या कुटुंबाचा,संस्थेचा,महाविद्यालयाचा आणि संपूर्ण औसा शहराचा गौरव वाढविला आहे. त्यांच्या या यशामागे द वर्ल्ड स्कूल इंडिया, औसाचे संस्थापक अध्यक्ष गणेश पाटील यांची पती म्हणून लाभलेली खंबीर साथ, सातत्यपूर्ण प्रोत्साहन, विश्वास आणि प्रेरणा हे महत्त्वाचे आधारस्तंभ ठरले. वैवाहिक आयुष्य, कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि शैक्षणिक ध्येय यांचा सुंदर समन्वय साधत या दाम्पत्याने समाजासमोर एक प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या या यशाबद्दल श्री.कुमारस्वामी महाविद्यालयाचे अध्यक्ष तथा विठ्ठल रुक्मिणी मंदिर संस्थान, पंढरपूर चे सहअध्यक्ष ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर, सचिव गिरीश पाटील महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ.कुसुम ढोणे,तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच औसा शहरवासीयांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## शिक्षक पदोन्नतीबाबत न्यायालयाचा मोठा निर्णय; 1 सप्टेंबरचा टीईटी कट-ऑफ रद्द..

**नागपूर :** शिक्षकांच्या पदोन्नतीसाठी १ सप्टेंबरपर्यंत टीईटी किंवा सीटीईटी उत्तीर्ण असणे बंधनकारक करणाऱ्या राज्य सरकारच्या भूमिकेला मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने मोठा धक्का दिला आहे. पदोन्नती प्रक्रिया सुरू होताना शिक्षकाकडे टीईटी/सीटीईटी पात्रता असणे हाच निकष आहे. त्यासाठी १ सप्टेंबरसारखी स्वतंत्र कट-ऑफ तारीख निश्चित करता येणार नाही, असे स्पष्ट करत न्यायालयाने शिक्षण संचालकांचे १४ मे २०२६ चे परिपत्रक रद्द केले. याचबरोबर राज्य सरकारला पदोन्नती प्रक्रियेसाठी नव्याने धोरण आखण्याचे निर्देशही दिले आहेत.

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठातील न्यायमूर्ती अनिल एल. पानसरे आणि न्यायमूर्ती रजनीश आर. व्यास यांनी अमरावती, बुलडाणा आणि यवतमाळ जिल्ह्यांतील शिक्षकांच्या याचिकांवर हा महत्त्वपूर्ण निर्णय दिला. राज्यातील शिक्षकांच्या पदोन्नती प्रक्रियेवर या निर्णयाचा दूरगामी परिणाम होण्याची शक्यता आहे.

शिक्षण संचालकांनी १४ मे २०२६ रोजी काढलेल्या परिपत्रकात १ सप्टेंबर २०२५ पर्यंत टीईटी/सीटीईटी पात्रता प्राप्त केलेल्या शिक्षकांचाच पदोन्नतीसाठी विचार करावा, असे निर्देश दिले होते. परिणामी, पदोन्नती प्रक्रिया सुरू होण्यापूर्वी टीईटी उत्तीर्ण झालेले अनेक शिक्षक केवळ १ सप्टेंबरच्या अटीमुळे पदोन्नतीपासून वंचित राहिले. या परिपत्रकाला शिक्षकांनी न्यायालयात आव्हान दिले होते.

खंडपीठाने सर्वोच्च न्यायालयाच्या अंजुमन इशाअत-ए-तालीम ट्रस्ट प्रकरणातील तसेच औरंगाबाद खंडपीठाच्या जावेद खान प्रकरणातील निर्णयांचा आधार घेत पदोन्नतीसाठी टीईटी/सीटीईटी पात्रता आवश्यक असली, तरी ती पदोन्नती प्रक्रिया सुरू होण्याच्या दिवशी शिक्षकाकडे असणे पुरेसे आहे, असे स्पष्ट केले. १ सप्टेंबरचा कट-ऑफ तारीख लावून पात्र शिक्षकांना पदोन्नतीपासून दूर ठेवणे कायद्याशी सुसंगत नसल्याचे नमूद करत संबंधित परिपत्रक रद्द करण्यात आले.न्यायालयाने आणखी एक महत्त्वाचा मुद्दा स्पष्ट केला. टीईटी/सीटीईटी पात्रता मिळाल्यामुळे शिक्षकाची ज्येष्ठता बदलत नाही. ज्येष्ठता आणि पदोन्नतीसाठीची पात्रता या दोन स्वतंत्र बाबी असून, पात्रता मिळाल्याच्या आधारे कनिष्ठ शिक्षकाला ज्येष्ठ शिक्षकाच्या पुढे स्थान देता येणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. राज्यात पदोन्नती प्रक्रियेत एकसमानता राहावी, यासाठी सरकारने १ ऑगस्ट २०१९ च्या शासन निर्णयाचा फेरविचार करून दरवर्षी १ जानेवारी ही पदोन्नतीसाठी पात्रता निश्चित करण्याची कट-ऑफ तारीख ठेवण्याचा विचार करावा, असे न्यायालयाने सुचविले आहे. त्यानुसार १ जानेवारीपासून पदोन्नती प्रक्रिया सुरू करून ती ३१ मार्चपर्यंत पूर्ण करावी आणि एप्रिल किंवा १५ मेपर्यंत पदोन्नती आदेश काढावेत, असेही न्यायालयाने नमूद केले.

# रोटरी क्लब ऑफ लातूर होरायझनचा पदग्रहण सोहळा उत्साहात संपन्न

**लातूर/प्रतिनिधी :** रोटरी ही आंतरराष्ट्रीय पातळीवरील स्वयंसेवी संघटना असून तिचे कार्य २१० राष्ट्रांमध्ये आहे. रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२मध्ये रेवेन्यू ११ जिल्ह्यांचा समावेश असून यामध्ये लातूर जिल्हा सुद्धा समाविष्ट आहे. लातूर शहरांमध्ये एकूण ०६ रोटरी क्लब असून यामध्ये रोटरी क्लब ऑफ लातूर होरायझनची सुरुवात २००७ साली माजी प्रांतपाल डॉ.विजयभाऊ राठी, डॉ. गोपीकिशन भराडिया आणि स्व.सीए तेजमल बोरा यांच्या पुढाकारातून झाली आहे. तेव्हापासून ते आजपर्यंत या क्लबद्वारे विविध सामाजिक आणि समाजपयोगी उपक्रम राबवून त्यांनी संपूर्ण जिल्ह्यात आपली एक वेगळी ओळख निर्माण केली आहे.

या क्लबचा सन २०२६-२७चा पदग्रहण सोहळा भालचंद्र ब्लड बँकेमध्ये मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाला आयपीडीजी रो.सुधीर लातूरे, नूतन सहाय्यक प्रांतपाल रो. डॉ.राजगोपाल तापडिया, मावळते अध्यक्ष रो.डॉ.गुणवंत बिरादार, नूतन अध्यक्ष रो.डॉ.माधव गोरे आणि नूतन सचिव रो.डॉ.घन:श्याम ताडेवार यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले.





यानंतर प्रा.आशिष क्षीरसागर यांनी मावळते अध्यक्ष व सचिव यांना कॉलर प्रदान केले. त्यानंतर राष्ट्रगीत आणि फोरवे टेस्टचे वाचन करण्यात आले. रो.डॉ.गुणवंत बिरादार यांनी रोटरी वर्ष २०२५-२६ मध्ये संपन्न केलेल्या विविध कार्यक्रमाची सविस्तर माहिती सर्वांना दिली.

यावेळी नूतन अध्यक्ष रो.डॉ.माधव गोरे म्हणाले की, रोटरी वर्ष २०२६-२७मध्ये आंतरराष्ट्रीय रोटरी कडून प्राप्त झालेल्या विविध उपक्रम यशस्वीरित्या राबवण्याचे नियोजन आम्ही केले आहे. दिव्यांग, पर्यावरण, शेती, शिक्षण, आदिशक्ती आणि आरोग्य आदि विविध उपक्रमाची अंमलबजावणी सर्वांच्या सहकार्याने केली. जाईल. माझ्यासारख्या दिव्यांग व्यक्तीला अध्यक्षपदाची जबाबदारी क्लब मधील सर्व सदस्यांनी दिली ती माझ्या कार्यकुशलतेने मी पूर्ण करण्याचा प्रयत्न करेल असेही ते म्हणाले.

यावेळी मार्गदर्शन करताना आयपीडीजी रो.सुधीर लातूरे म्हणाले की, रोटरी क्लब लातूर होरायझनचे कार्य प्रशंसणीय आहे. क्लबमध्ये अध्यक्ष यांच्या पुढाकाराने व सर्वांच्या सहकार्याने कार्य करण्याची भावना असल्यामुळे या क्लबने रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२मध्ये आपली एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. अध्यक्ष रो.डॉ.गुणवंत बिरादार यांनी क्लबमधील सर्व सदस्यांच्या सहकार्याने आणि स्वत: पुढाकार घेऊन वर्षभर विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून आपल्या क्लबला सशक्त केले त्याबद्दल त्यांनी त्यांचे कौतुक केले.

यावेळी सहाय्यक प्रांतपाल रो.डॉ. राजगोपाल तापडिया म्हणाले की, रोटरी क्लब ऑफ लातूर होरायझनने २०२५-२६ मध्ये उत्कृष्ट कार्य केलेले आहे आणि यावर्षी सुद्धा या क्लबद्वारे विविध कार्यक्रम राबविले जातील असे सांगून अध्यक्ष रो.डॉ.माधव गोरे हे जरी दृष्टी बाधित असले तरी ते दृष्टिकोन बाधित नाही असे सांगून त्यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी वसंतराव नाईक कृषिभूषण पुरस्कार प्राप्त श्रीकृष्ण शिंदे म्हणाले की, भारत हा कृषिप्रधान देश आहे.

मी अनेक देशाचा अभ्यास दौरा केलेला आहे. त्यामुळे माझ्याजवळ असलेली शेती संबंधीची शास्त्रशुद्ध माहिती मी रोटरी क्लब ऑफ लातूर होरायजनच्या माध्यमातून लोकापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करेल आणि त्यासाठी लागणारे आर्थिक पाठबळ सुद्धा या क्लबला मी भविष्यामध्ये देईल असे ते म्हणाले.

या कार्यक्रमांमध्ये रोटरी क्लब ऑफ लातूरचे अध्यक्ष रो.विश्वनाथ निगुडगे, सचिव रो.नरेश कोरे, रोटरी क्लब ऑफ लातूर मेट्रोचे अध्यक्ष रो.विजय कोळी, सचिव रो.मनोज सूर्यवंशी आणि रो. दत्ता बेडके, चाकूर क्लबच्या ॲड.धनंजय चिताडे, मातोश्री इंदिराबाई गोरे, सुजाता गोरे, अस्मिता चोंडे पाटील, पंकज चोंडे पाटील, सुजाता ताडेवाड, नवीन सदस्य रो.बापूसाहेब सांडूर, प्रा.केशव बिरादार, रुद्राक्ष खज्जे, किशोर ससाणे आणि प्रशांत रब्बेवार यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी प्रमुख अतिथी डॉ. अर्चनाताई पाटील यांचा संदेश डॉ.संजय गवई यांनी तर रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२चे प्रांतपाल रो.जयेशभाई पटेल यांचा संदेश सहाय्यक प्रांतपाल रो.डॉ.राजगोपाल तापडिया यांनी वाचून दाखविला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रो.डॉ.संजय गवई यांनी केले तर आभार नूतन सचिव रो.डॉ.घन:श्याम ताडेवार यांनी मानले. कार्यक्रमाचे स्वागत गीत रुद्राक्ष खज्जे यांनी सादर केले.

या कार्यक्रमाला डॉ.विजयभाऊ राठी, डॉ.गोपीकिशन भराडिया, निळकंठ स्वामी, बी.पी. सूर्यवंशी, महादेव पांडे, प्रा.सिद्धलिंग गुजर, प्रा.आशिष क्षिरसागर, आशिष बाहेती, प्रा.माधव नायणे, अमोल निलंगेकर, राहुल गोदाम, मीरा चोपडे, संदीप चोपडे यांच्यासह रोटरी परिवारातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शेख शमशोद्दीन, सुमित भडके, सार्थक गवई यांनी परिश्रम घेतले.

## महामार्ग पोलीस व वाहतूक पोलिसांचा त्रास बंद करावा : प्रदीप पाटील खंडापूरकर



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्ह्यात वाहनधारकांना महामार्ग पोलीस आणि वाहतूक शाखेच्या पोलीस कर्मचाऱ्यांकडून होणारा त्रास बंद करावा,अशी मागणी अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर (बाबा) यांनी एका लेखी निवेदनाद्वारे नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्याकडे केली आहे.

पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांना दिलेल्या निवेदनात खंडापूरकर यांनी पुढे असे नमूद केले आहे की, लातूर जिल्ह्यात अनेक वाहनधारकांनी कर्ज घेऊन वाहने घेतली आहेत. ते आपल्या वाहनातून शेतमाल व अन्य धान्याची वाहतूक करतात. वाहतूक करत असतांना वाहधारकांसोबत वाहनांची सर्व कागदपत्रेही असतात. तरीही महामार्ग पोलीस त्यांना रस्त्यात कोठेही अडवून पैशांची मागणी करतात. पैसे नाही दिले तर नाहक ऑनलाईन दंड आकाराला जातो. अनेकदा महामार्ग पोलिसांसोबत वरिष्ठ अधिकारी नसतांनाही ही कृती केली जाते. अनेक ठिकाणी होमगार्ड हातात मशीन घेऊन दंड मारताना दिसून आल्याचे निवेदनात म्हटले आहे.

वाहानधारकांनी मोठ्या प्रमाणात कर्ज घेऊन वाहने खरेदी केलेली असतात.त्यावर त्यांच्या कुटुंबियांची उपजिविका अवलंबून असते. त्यातच आरटीओ इन्स्पेक्टर, महामार्ग पोलिसांनी वाहतूक शाखेच्या पोलिसांचा त्रास यामुळे वाहनधारकांचे अतोनात नुकसान होत आहे. त्यांना कर्जाची परतफेड करण्यासाठी अडचणी येत आहेत. कर्जाचे हप्ते वेळेवर भरणे अशक्य झाल्याने बँक वाहन जप्त करण्यासाठी पुढे येत आहेत. त्यामुळे वाहनधारक मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहे. वाहन धारकाचा त्रास सोडविण्यासाठी आम्ही संघटना म्हणून अनेकवेळा आवाज उठवला, पण त्याचा फारसा उपयोग झाला नाही. त्यामुळे याकामी आता नांदेड परिक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक या नात्याने आपणच लक्ष घालून वाहनधारकांची समस्या सोडवावी. महामार्ग पोलीस व वाहतूक शाखेच्या पोलीस कर्मचाऱ्यांची बैठक बोलावून वाहनधारकांना नाहक त्रास न देण्याच्या सूचना द्याव्यात अशी, आग्रही मागणीही प्रदीप पाटील खंडापूरकर बाबा यांनी या निवेदनाच्या माध्यमातून केली आहे.

## अ. भा. भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीच्यावतीने लातूर आरटीओ कार्यालयावर भव्य मोर्चा



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर आरटीओ कार्यालयाच्या अधिकाऱ्यांकडून केल्या जाणाऱ्या भ्रष्टाचार व चुकीच्या कारवाईच्या निषेधार्थ अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर यांच्या नेतृत्वाखाली डोक्यावर एका टोपल्यात दोन कोंबड्या, दारूच्या बाटल्या व चिल्लर पैसे घेऊन भव्य मोर्चा काढण्यात आला. या मोर्चास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

आरटीओ कार्यालयाकडून वाहनधारकांची केली जाणारी अडवणूक व आर्थिक लुट थांबविण्यात यावी अशी मागणी वारंवार करूनही संबंधित विभागाचे अधिकारी त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याच्या निषेधार्थ डोक्यावर एका टोपल्यात दोन कोंबड्या, दारूच्या बाटल्या व चिल्लर पैसे घेऊन हा आगळा वेगळा मोर्चा काढण्यात आला. मोर्चात सहभागी झालेल्या नागरिकांनी मोठ्या प्रमाणात घोषणाबाजी करून वाहनधारकांची अडवणूक करणाऱ्या अधिकाऱ्यांची गाढवावरून धिंड काढण्याची जाहीर धमकी दिल्यामुळे भेदरलेला एकही अधिकारी मोर्चास सामोरा आला नाही. त्यामुळे संतप्त मोर्चेकऱ्यांनी तब्बल दोन तास आरटीओ कार्यालयासमोर ठिय्या धरला. शेवटी पोलीस अधिकाऱ्यांनी हस्तक्षेप करून आरटीओ अधिकाऱ्यांना मोर्चासमोर आणले. त्यावेळी अध्यक्ष खंडापूरकर यांनी अधिकाऱ्यांना एक महिन्यात कामकाजात सुधारणा नाही केल्यास यापेक्षाही तीव्र आंदोलनाचा मार्ग अवलंबण्याचा इशारा दिला. अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीच्या वतीने आयोजित केलेल्या या मोर्चामुळे बराच काळ आरटीओ कार्यालय परिसरातील वातावरण तणावपूर्ण बनले होते.

या मोर्चात राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर बाबा यांच्यासह राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य पृथ्वीराजसिंह पाटील खंडापूरकर, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षा विधी विभाग एड. राणीताई स्वामी, राष्ट्रीय सरचिटणीस अमोल नानजकर काशीबाई हांडे, शिवा काळे, नेताजी जाधव, पृथ्वीराज पवार, नागेश जाधव, सुनील शिंदे, अजय राठोड, किरण मुंडे, रामभाऊ जवळगे, अमोल भालेराव, वैभव घोबाळे, रेखा खंदाडे, साक्षी भातलवंडे ,विशाखा हातागळे , संकेत भोसले, शितल तमलवार, सुनील कदम, महेश पाटील, यांसह परभणी, छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, सोलापूर जिल्ह्यातील पदाधिकारी, कार्यकर्ते, वाहनधारक - वाहन चालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## व्हिएतनाममध्ये भारतीय पर्यटकांचा मोठा अपघात; बोट उलटल्याने १५ जणांचा मृत्यू

हनोई: शनिवारी व्हिएतनाममधील फू क्वोक बेटाजवळ अनेक भारतीय पर्यटकांना घेऊन जाणारी एक बोट उलटली. प्रसारमाध्यमांच्या वृत्तानुसार, या दुर्घटनेत भारतीय पर्यटकांसह १५ जणांचा मृत्यू झाला आहे. व्हिएतनामी न्यूज पोर्टल व्हीएनएक्सप्रेस इंटरनॅशनलच्या माहितीनुसार, ही स्पीडबोट ३२ भारतीय पर्यटक आणि चार कर्मचारी यांना घेऊन हॉन मे रुट ते आन थोई बंदराकडे जात होती. किनाऱ्यापासून सुमारे ४०० मीटर अंतरावर असताना ती उलटली, ज्यामुळे बोटीवरील सर्वजण समुद्रात पडले. फू क्वोक विशेष आर्थिक क्षेत्रातील अधिकाऱ्यांकडून मिळालेल्या प्राथमिक माहितीचा हवाला देत एका न्यूज पोर्टलने वृत्त दिले आहे की, सीमा रक्षक दल, नौदल, तटरक्षक दल आणि इतर पथके शोध आणि बचाव कार्यात सामील होण्यापूर्वीच जवळच्या पर्यटन बोटींनी मदतीसाठी धाव घेतली होती. या दुर्घटनेत एकूण १५ जणांचा मृत्यू झाल्याचे वृत्त आहे. मिळालेल्या वृत्तानुसार, मृतांमध्ये आंध्र प्रदेशातील तिघांचा समावेश आहे. कडपा जिल्ह्यातील मुडियम श्रीधर (वय ५६), हिंदूपूर येथील रवी आणि मछलीपट्टणम येथील जयश्री यांचा यात मृत्यू झाला. श्रीधर हे कडपा येथे लावा () फोनचे वितरक होते. याव्यतिरिक्त बंदर (मछलीपट्टणम) येथील किशोर यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे वृत्त आहे, तर कडपा येथीलच नईम नावाचा आणखी एक पर्यटक सुरक्षित आहे, कारण तो त्या बोटीत चढला नव्हता.

# पोलीस आपल्या सोसायटीत उपक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**लातूर/प्रतिनिधी :** कायदा व सुव्यवस्था राखण्याबरोबरच समाजाशी विश्वासाचे नाते अधिक दृढ करण्यासाठी लातूर जिल्हा पोलीस दलाने सुरू केलेला पोलीस आपल्या सोसायटीत हा उपक्रम नागरिकांसाठी विश्वासाचा आणि संवादाचा प्रभावी मंच ठरत आहे. दि. १५ जून २०२६ पासून सुरू झालेल्या या अभिनव उपक्रमाला सर्व स्तरांतून मोठा प्रतिसाद मिळत असताना महिलांचा वाढता सहभाग विशेष लक्षवेधी ठरत आहे. अनेक वर्षांपासून मनात दडवून ठेवलेल्या समस्या, सुरक्षेच्या चिंता आणि सामाजिक प्रश्न महिलांनी प्रथमच इतक्या मोठ्या प्रमाणावर थेट पोलीस अधिकाऱ्यांसमोर मांडण्यास सुरुवात केली असून, हा बदल समाजासाठी अत्यंत सकारात्मक मानला जात आहे.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत असलेल्या या उपक्रमामध्ये पोलीस अधिकारी आणि अंमलदार दररोज विविध गृहनिर्माण सोसायट्या, निवासी संकुले व वसाहतींना भेट देत आहेत. प्रत्येक ठिकाणी नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधून त्यांच्या अडीअडचणी जाणून घेणे, स्थानिक प्रश्न समजून घेणे आणि त्यावर त्वरित उपाययोजना करण्याचा प्रयत्न केला जात आहे. या भेटींमध्ये महिलांची उपस्थिती लक्षणीय असल्याचे दिसून आले असून, त्यांच्या सहभागामुळे उपक्रमाला अधिक सामाजिक बळ मिळत आहे.

यापूर्वी अनेक महिलांना पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार देण्यास किंवा पोलिसांशी प्रत्यक्ष संवाद साधण्यास संकोच वाटत असे. मात्र आता पोलीसच त्यांच्या दारात पोहोचत असल्याने महिलांमध्ये आत्मविश्वास वाढला आहे. घरगुती वाद, महिलांच्या सुरक्षिततेचे प्रश्न, छेडछाड, सायबर गुन्हे, सोशल मीडियाचा गैरवापर, अल्पवयीन मुलांचे संरक्षण, व्यसनाधीनता, शेजारील वाद, सार्वजनिक ठिकाणांची सुरक्षितता तसेच इतर सामाजिक समस्यांबाबत त्या मोकळेपणाने चर्चा करत असून, आवश्यक ते कायदेशीर मार्गदर्शन आणि समुपदेशनही घेत आहेत.

या उपक्रमाद्वारे नागरिकांना डायल ११२ आपत्कालीन सेवा, सायबर सुरक्षेचे उपाय, ऑनलाइन आर्थिक फसवणूक टाळण्याबाबतची खबरदारी, दामिनी पथकाचे कार्य, महिला व बालक संरक्षण, ज्येष्ठ नागरिक सुरक्षा, वाहतूक नियम, अमली पदार्थांविरोधातील जनजागृती तसेच समाजातील प्रत्येक नागरिकाची कायदा-सुव्यवस्था राखण्यात असलेली



भूमिका याबाबत सविस्तर माहिती दिली जात आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये कायद्याबाबत जागरूकता वाढत असून, प्रतिबंधात्मक पोलिसिंगला अधिक बळ मिळत आहे.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.